# प्रकरण चौथे

" अभोगी " व " जोगीण " या दोन कादंब-यांचा
तुलनात्मक अभ्यास

## प्रस्तावना :

मागील प्रकरणातून आपण रणजित देसाई यांच्या "अभोगी" या कादंबरीचा व सुभाष भेंडे यांच्या " जोगीण " या कादंबरीचा सामाजिक, वाङ्मयीन अंगाने अभ्यास केला. या प्रकरणात आपण या दोन कादंबरीचा विविध अंगाने तुलनात्मक अभ्यास करू.

" अभोगी " व " जोगीण " या दोन कादंबऱ्या गोव्याच्या पार्श्वभूमीवर लिहलेल्या आहेत. गोव्यातील निसर्ग, तीथले समाजजीवन त्यांच्या धार्मिक, सामाजिक, कौटुंबिक परंपरा आणि त्यातून निर्माण झालेले प्रश्न या कादंबऱ्यामधून चित्रीत केलेले आहेत. जोगीण कादंबरीचे लेखक सुभाष भेंडे हे मुळचे गोव्यातील असल्यामुळे त्यांनी गोव्याचे जीवन जवळून पाहिले व अनुभवले आहे. त्यांनी इतरत्र गोव्याच्या जीवनावर लेखनही केले आहे, तर रणजित देसाई हे गोव्याच्या जवळ असलेल्या कोल्हापूरच्या परिसरातील लेखक आहेत. संगीत आणि निसर्ग यांच्या आवडीमुळे गोव्याशी त्यांचा संपर्क होता. हे दोन लेखक हिंदू धर्मीय असून त्यांनी दोन वेगवेगळया धर्मातील स्त्रीयांच्या प्रश्नावर लेखन केले आहे. या दोन लेखकांचे व्यक्तिमत्व स्वभाव, प्रकृती पिंड, आणि जीवन-विषयक दृष्टीकोनही भिन्न आहे. त्यामुळे त्यांनी निर्माण केलेल्या कलाकृतीचे स्वरूप ही वेगवेगळे झाले आहे याचा विचार पुढे येईलच.

## दोन भिन्न धर्मीय स्त्रीयांचे प्रश्न : भाविण व जोगीण

रणजित देसाई यांनी हिंदु धर्मातील भाविणीच्या प्रश्नावर " अभोगी " ही कादंबरी लिहिली आहे. हिंदू धर्मात श्रध्देने वा नवसाने देवाला मुली सोडल्या जातात. देवदासी, मुरळया, जोगतिणी, किंवा भोविणी या नावांनी त्या ओळखल्या जातात. देवाला सोडलेल्या या स्त्रीयांचे जीवन अतिशय दाहक आणि दुःख दारिद्र्याने गांजलेले असते. धर्माच्या नावावर ज्या समाजात भोगदासी म्हणूनच वावरत

असतात. माणूस म्हणून येणारे हक्क त्यांना मिळत नाहीत. सर्वच दृष्टीने त्यांच्या जीवनाची ससेहोलपट होत असते. अभोगी या कादंबरीत भाविणाचे चित्रण केले आहे. भाविणीची प्रथा प्रामुख्याने गोव्या व कोकणपट्टीतच आढळते. भाविण म्हणून जीवन जगणारी स्त्री एखादया प्रसिध्द मंदिराशी संबंधीत असते. भाविणीला देवाची सेवा करावी लागते. आयुष्य भर पालखीपुढे नाचगाणे करावे लागते. आरतीच्या वेळी हजर राहून कुणी हैाशी धनी मिळाला तर त्यांचा विडा स्वीकारून त्याला घरी घेऊन त्याची संगत करावी लागते. आयुष्यभर वेगवेगळया धन्याची सेवा केल्यामुळे वृध्दापकाळी तिची अत्यंत हालाकीची परिस्थिती होते. तारूण्य ओसरलेले असते, शरीर अनेक रोगांनी पछाडलेले असते. अत्यंत हालाखीत मंदीराच्या परिसरातच तिला आपले जीवन संपवावे लागते.

भाविण ही जरी मंदिराची सेवा करीत असली तरी मंदिरातील तिचे स्थान केवळ झाडलोट करणा-या एखादया दासी सारखेच असते. धार्मिक दृष्टया पुजारी, बडवे, किंवा भटजी यांना जे अधिकार असतात ते भाविणीला असत नाही अध्यात्मिक हळव्या भाविण ही कोणी विरक्त जोगीनी नव्हे तिने अध्यात्मिक साधनाही केलेली नसते. आध्यात्मात तिचा अधिकारअसावा अशीही धर्माची किंवा समाजाची अपेक्षा नसते. ती एक सामान्य स्त्री असते. तिने मंदिरात हालक्या दर्जाची कामे करून समाजातील ऐफतदारांची शैया सोबत करावी लागते. त्यामुळे भाविणीचा समाजातील दर्जा अत्यंत हीन पातळीवरचा असतो. समाज ही तिच्याकडे देवाला सोडलेली स्त्री अशाच भावनेने पाहतो. अशा स्त्रीला स्वाभिमानाने, माणूस म्हणून जगता येत नाही.

भाविण ही सामान्य स्त्री असल्यामुळे मंदिराच्या परिसरात ती कुटुंब करून जगू शकते. एखादया श्रीमंत धनीकाची मागणी आल्यास त्यांच्या घरात त्यांच्याशी एकनिष्ठ राहून जीवन कंठावे लागते. अशा कुटुंबात तिला लग्नाच्या पत्नीचा दर्जा मिळत नसला तरी अन्न, वस्त्र, निवा-याची आणि संरक्षणाची सोय झाल्यामुळे तिचे

जीवन इतर भाविणीपेक्षा थोडे फार सुसहय ठरते पण परंपरागत भाविणीचे जीवन स्वीकारलेल्या स्त्रीला मात्र अनेक पुरुषांची संबंध ठेवावे लागतात या संबंधातून जन्माला आलेल्या मुलामुलींचा सांभाळ करावा लागतो. त्यांचे पितृत्व सर्व स्वीकारायला संबंधीत पुरुषवर्ग तयार नसतो. त्यामुळे पुरुष नसलेल्या कौटुंबिक जीवन भाविणीला जगावे लागते.

भाविणीची रुढी ही परंपरेने चालत आलेली आहे. कधी काळी सरदार,जहागिरदारांच्या ठेवलेल्या स्त्रीयापासून ज्या मुली झाल्या त्या मंदिराला वाहिल्यामुळे ही परंपरा सुरु झाली. पुढे भाविणीची मुलगी भाविण याच पध्दतीने ही परंपर चालत आली आहे. अभोगीची नायिका केशर ही भाविणीची मुलगी असल्यामुळे तिला भाविणच संबोधले जाते. अशा भाविणीच्या मुलीचा प्रश्न निर्माण होतो. तो परंपरागत पध्दतीनेच सोडविला जातो. कुणीही उच्च कुलीन सुसंस्कृत रुपदारमुलगा अशा मुलींना पत्नी म्हणून स्वीकारत नाहीत. एखादा श्रीमंत विधूर तिला मागणी घालून घरात भोगदासी म्हणून ठेऊन घेतो वा अशा मुलीने आईच्या पावलावर पाऊल टाकून परंपरागत भाविणीचे जीवन स्वीकारावे लागते.. ऐहिक जीवनाच्या दृष्टीने विचार केला तर भाविणीचा सामाजिक दर्जा श्रेष्ठ नसला तरी तिला ऐहिक जीवन उपभोगण्याचे स्वातंत्र्य असते. विचार भावना व्यक्त करण्याचे स्वातंत्र असते. आर्थिक परिस्थितीमुळे तिला भाविण म्हणून काम करावे लागत असले तरी काही वेळेला आर्थिक संपन्नताही तिला मिळण्याची शक्यता असते. भावनिक आणि शारीरिक दृष्टया जोगीणीचा जसा कोंडमारा होतो तसा कोंडमारा भाविणीला स्वीकारावा लागत नाही. उलट प्रसंगी अनिच्छेने आणि परस्थितीने तिला अनेक पुरुषाशी संबंध ठेवावे लागतात. हिंदु समाजात पारलौकिक दृष्टया भाविनीला कोणतेही श्रेष्ठ स्थान नाही. देवाच्या नावावर समाजाला सोडलेली ती दासीच असते.अशी जीवघेणी प्रथा गोवा आणि कोकणाच्या मंदिरात आढळते. या भाविणी नृत्य गायनात निपून

असतात. त्यांना देवाच्या पालखीपुढे नाचावे लागते आणि गावे लागते. या कलेचा वापर त्या आपल्या धन्याचे मन रिजवण्यासाठी करतात. त्यांच्या अंगी असलेल्या कलेचे कौतुक ही समाज करेल असे नाही. अशा प्रकारे हिंदु धर्मात आढळणारी स्त्री जीवनाच्या दृष्टीने अत्यंत हिन दर्जाची रूढी आणि परंपरा कोकण गोव्याच्या परिसरात आढळते. त्याच भाविणीच्या जीवनावर 'अभोगी' ही कादंबरी आहे.

सुभाष भेंडे यांनी ख्रिश्चन धर्मातील नन्सच्या प्रश्नावर " जोगीण" ही कादंबरी लिहली आहे. पंधराव्या शतकापासून पाश्चात्य देशातील डच, इंग्रज, पोर्तुगाल लोक व्यापारासाठी भारतात आले. पुढे त्यांनी हिंदुस्थानामध्ये राजकीय सत्ता प्रस्थापित केली. जेते नेहमी जितावर आपला धर्म, संस्कृती आणि भाषा लादत असतात. राज्यसत्तेच्या प्रोत्साहनाने भारतात ख्रिश्चन धर्माचा प्रसार होऊ लागतो. हिंदुस्थानातील अनेक लोक धर्मांतरीत होऊन ख्रिश्चन झाले. गोव्यात दीर्घकाळ पोर्तुगीजांची सत्ता असल्यामुळे तिथे मोठया प्रमाणावर ख्रिश्चन धर्माचा प्रसार झालेला दिसतो. आज ही गोव्यात ख्रिश्चनांची संख्या लक्षणीय स्वरूपाची आहे. ख्रिश्चन धर्माचे प्रवर्तक येशू ख्रिस्त यांच्या सेवेसाठी राहिलेल्या मुलींना याधर्मात नन असे संबोधले जाते. पूर्व ख्रिश्चन धर्मानुसार येशूची आई मेरी ही सुध्दा देवाला वाहिलेली देवदासी होती. मध्ययुगीन कालखंडात ख्रिश्चन धर्माने येशू आणि चर्चच्या संबंधाने पवित्र स्त्रियांची म्हणजे जोगीणीची परंपरा निर्माण केली ही परंपरा ख्रिश्चन धर्मात अजूनही चालू असलेली दिसते. ख्रिश्चन धर्मात, श्रध्देने नवसासाठी नन सोडल्या जातात.काही वेळेला मुली स्वत:हून जोगीणीचे जीवन स्वीकारतात. कुरूप असल्यामुळे लग्न होत नाही म्हणून वा प्रेम भंग झाल्यामुळे काही मुली वैतागाने ऐहिक जीवनाचा त्याग करून कॉन्व्हेंटचे व्हॅकेशन स्वीकारतात. ख्रिश्चन धर्मात मुलींना जोगीण व्हावे म्हणून जबरदस्ती व अन्याय केला जात नाही. शक्यतो स्वखुशीनेच जोगीणीचे जीवन स्वीकारतात. पण तरुण, अल्लड व अपरिपक्व मुलींनी जोगीणी बनण्याचा स्वखुशीने

घेतलेला निर्णय सर्वबाजूने विचार करून घेतलेला असतो असे नाही. पुढे जोगीण बनताना किंवा बनल्यावर त्यांच्या जो ऐहिक व भावनिक व मानसिक कोंडमारा होतो त्याला कंटाळून त्या स्वत: कॉन्व्हेंट सोडून जातात व लौकिक जीवन स्वीकारतात.

नन चे जीवन स्वीकारणा-या मुलींना हुंडा ( डॅावरी ) देऊन कॉन्व्हेंट मध्ये प्रवेश दिला जातो. अशा मुलींनी आपले ऐहिक जीवनाचे सर्व पाश तोडून आध्यात्मिक विरक्त जीवन स्वीकारावे अशी अपेक्षा असते. यासाठी कॉन्व्हेंट मध्ये त्यांना साडे चार वर्षाच्या कालावधीत शिक्षण दिले जाते." सहा महिन्याचा उमेदवारी काळ त्यानंतर एक वर्ष नॉव्हीशियट व नंतर तीन वर्ष वॅाऊन."[1] अशा प्रक्रियेतून ऐहिक जीवनाकडून त्यांना पारलौकिक जीवनाकडे नेले जाते. या कालखंडात त्यांना प्रार्थना, बायबलचे वाचन, येशूचे चिंतन, मनन स्वत:च्या मनोविकारावर विजय मिळवावा लागतो. संसारी जीवनातील सर्व पाश सोडून संपूर्ण नवे जीवन अंगीकारावे लागते. एखाद्या सामान्य संसारी भक्ताचा अलौकिक साधू पुरूष व्हावा त्याच प्रक्रियेतून सामान्य मुलींना विरक्ती जोगणीच्या अवस्थेपर्यंत जावे लागते. वस्तुत: जोगीणीचे जीवन स्वीकारणे हे एक असिधाराव्रतच असते. सर्वसामान्य स्त्रीला ते कोणत्याच दृष्टीने पेलणारे नसते. पण कॉन्व्हेंटमध्ये धार्मिक वातावरणात अशा जोगीणी घडविण्याचे प्रयत्न होतात. पुढे या जोगीणींना ख्रिश्चन धर्माच्या विचारानुसार दीन दलितांची, अनाथ व रूग्णाची मानवतावादी भावनेने मनोभावे सेवा करावी लागते. अशा मुली शिक्षीका, परिचारिका, समाजसेविका म्हणून काम करतात.

धार्मिक दृष्टया वरवर पाहता जोगीणीचे जीवन उदात्त आणि पवित्र वाटत असले तरी सर्वसामान्य मुलींना हे जीवन स्वीकारल्यानंतर कॉन्व्हेंटमध्ये कशा अ हालअपेष्टा सहन कराव्या लागतात त्यांचा भावनिक, मानसिक, शारीरिक कोंडमारा होतो त्याचे चित्र 'जोगीण" या कादंबरीत आले आहे.

नन्स या कौटुंबिक आणि ऐहिक जीवन स्वइच्छेने सोडून आल्याने अशा जोगीणींना कौटुंबिक जीवन स्वीकारता येत नाही, त्यांचा विवाह येशूशी झालेला असल्यामुळे त्यांना विवाह करता येत नाही. किंवा इतर पुरुषांशी संबंध ठेवता येत नाही. त्यांना मुलेबाळे नसतात. त्यामुळे कुटुंबाचा प्रश्नच येत नाही. साहजिकच जोगीणीची परंपराही परंपरागत चालत येत नाही. जोगीणी या येशूला पूर्णपणे वाहून घेत असल्यामुळे आणि धार्मिक आचार व विचाराने जीवन जगत असल्यामुळे त्यांनी व्यक्तिस्वातंत्र्य असत नाही, आपल्या भावभावना, राग, लोभ प्रवृत्ती, मानसिक आणि शारीरिक गरजा त्यांना व्यक्तकरता येत नाहीत. त्यामुळे त्यांना स्वातंत्र्य उपभोगिता येत नाहीत. त्यामुळे लौकिकदृष्टया माणूस म्हणून येणारे हक्क ही उपभोगता येत नाहीत. ख्रिश्चनसमाजात चर्च मध्ये फारच्या खालोखाल जोगीणी बद्दल आदरभाव बाळगला जातो. त्यांचा सामाजिक दर्जा ही वरचा असतो. हिंदू धर्मातील देवदासी भाविण यांच्या सारखे भोगदासीचे स्वरूप आणि त्या अनुषंगाने येणारे हीन दर्जा जोगीणीला प्राप्त होत नाही.

ख्रिश्चन धर्मातील जोगीणींच्या प्रथेतील वैगुण्यही आढळतात. कॉन्व्हेंट मध्ये धार्मिक रुढी परंपरा बायबलच्या आज्ञांमुळे जोगीणीला स्वीकाराव्या लागणाऱ्या जीवनाचे व त्यांचा होणारा भावनिक मानसिक आणि शारीरिक कोंडमारा सुभाष भेंडे यांनी 'जोगीण' या कादंबरीत चित्रित केला आहे. या अनुषंगाने वरवर पवित्र वाटणाऱ्या जोगीणींच्या धार्मिक परंपरेपाठीमागील भयानक वास्तव त्यांनी या कादंबरीत चित्रित करून ख्रिश्चनधर्मातील वैगुण्यावर नेमकेपणाने बोट ठेवले आहे.

रणजित देसाई व सुभाष भेंडे या दोन लेखकाचा वाङ्मयीन पिंड

लेखकाच्या व्यक्तिमत्वाचा त्यांच्या प्रकृती व पिंड आणि त्यांच्या जीवनविषयक दृष्टीकोणाचा कलाकृतीवर प्रत्यक्ष अप्रत्यक्षरित्या परिणाम होत असतो. या दृष्टीने अभोगीचे लेखक रणजित देसाई आणि जोगीणीचे लेखक सुभाष भेंडे या दोन लेखकाची व्यक्तिचित्रे भिन्न स्वरूपाची असलेली आढळतात. रणजित देसाई हे सरंजामीवातावरणात वाढलेले सौंदर्यवादी दृष्टीकोण असलेले लेखक आहेत. तर सुभाष भेंडे हे गोव्याच्या पार्श्वभूमीवर सामान्य कुटुंबातून आलेले गंभीर आणि विनोदी प्रकृतीचे लेखक आहेत. त्यांच्या कादंब-यावरून त्यांचा पिंड हा सामाजिक प्रश्न हाताळणा-या गंभीर लेखकाचा दिसून येतो. उदा. बॅानसाय चकवा, जोगीण. यामुळे या दोन लेखकानी लिहिलेल्या "अभोगी " आणि "जोगीण" या कादंबरीच्या स्वरूपातही फरक पडलेला दिसतो. रणजित देसाई भाविणीचा प्रश्न जरी कादंबरीचा विषय म्हणून निवडत असले तरी भाविणीचे जीवघेणे दु:ख तीला भोगाव्या लागणा-या यातना समाजातील तिचे स्थान, आणि तिच्या जीवनातील दाहकता गांभीर्याने आणि तितक्याच वास्तववादी आणि कलात्मक पध्दतीने चित्रित करतात असे दिसत नाही. भाविणीच्या मुख्य प्रश्नाला बगल देऊन ते भाविणीच्या सुंदर मुलीची प्रेमकहाणी चित्रित करतात. त्यामुळे अभोगी कादंबरीचे स्वरूप वास्तववादी सामाजिक कादंबरीचे होण्याऐवजी ते रंजनवादी काल्पनिक कादंबरीचे होते.

तर सुभाष भेंडे ख्रिश्चनधर्मातील जोगीणीचा प्रश्न कॅान्व्हेटचे जग तिथल्या धार्मिक रूढी, परंपरा, त्यातून होणारा, भावनिक, शारीरिक मानसिक कोंडमारा गंभीरपणे व वास्तववादी भूमिकेने चित्रित करतात. त्यामुळे अभोगीच्या तुलनेत जोगीणी या कादंबरीचे स्वरूप अधिक सामाजिक आणि कलात्मक झाले आहे.

" अभोगी " व " जोगीण " या दोन कादंबरीतील स्त्री

जीवनाच्या दृष्टीने तुलना

रणजित देसाई यांची अभोगी व सुभाष भेंडे यांची जोगीण या दोन कादंब-याची स्त्री जीवन चित्रणाचे दृष्टीने धार्मिक आणि सामाजिक अंगाने तुलना केली तर पुढील गोष्टी दिसून येतात कोणताही लेखक सामाजिक प्रश्नाचे चित्रण व्यक्तिचित्रणाच्या माध्यमातून करतो. भाविणीचा प्रश्न, अभोगी या कादंबरी चित्रित करताना लेखकाने चंपा व केशर या दोन व्यक्तिरेखा निर्माण केल्या आहेत. चंपा ही मंगेशीच्या मंदिरातील एक भाविण आहे. परंपरेने येणारे भाविणीची जीवन ती जगत आहे. तर केशर ही तिची तरूण मुलगी भाविणीची मुलगी म्हणून परंपरेच्या दृष्टीने भाविण संबोधली जाते लेखकाने चंपाचे जीवन विस्ताराने चित्रित केले नाही खरे तर भाविणीचे जीव घेणे दु:ख अनुभवणारीच चंपा कादंबरीतील मुख्य व्यक्तिरेखा व्हायला हवी होती पण लेखकाला भाविणींची धार्मिक परंपरा त्यातून निर्माण होणारे भाविणीचे सामाजिक प्रश्न, भाविण म्हणून येणारे दु:ख, अवहेलना, अनेक पुरुषाशी ठेवावे लागणारे संबंध, आणि त्यांच्या वासनेशी बनावी लागणारी शिकार मंदिरातील तिची हलकी कामे लोकांच्या रंजनासाठी करावे लागणारे नृत्य आणि गायन या गोष्टीचे वास्तव आणि भेदक चित्रण अभोगी या कादंबरीत चित्रित करावयाचे नव्हते. उलट निवेदनाच्या ओघात चंपा आपल्या केशर या मुलीला "भाविणींच्या वाटयाला आलेले जीवन सांगते. " भाविणीच आयुष्य काय असतं ते ? देवाची सेवा करायची, पालखीपुढे नाचायचं, आरतीच्या वेळी भिंतीला पाठ टेकून उभे राहायचं, पुजा-याने दिलेला विडा घ्यायचा, कुणी हौशी धनी मिळाला तर घरी घेऊन जायचं त्यांची संगत करायची. "[२]

" आयुष्यभर हेच करत वृध्दापकाळी रोगानी पछाडलेलं शरीर देवाच्या कुंडात लोटून देऊन संपवायचे".[3] असले भयाण आयुष्य चंपाने वर्णन केले आहे, पण कादंबरीत ते चित्रित झालेले नाही. लेखकाला ख-या अर्थाने सामाजिक दृष्टीने भाविणीचे चित्रण करायचे असते तर त्यांनी याच जीवनाला मध्यवर्ती आशय करून कादंबरी लिहिली असती. पण रणजित देसाई आपल्या अभोगी या कादंबरीत हे करताना आढळत नाहीत.

रणजित देसाई यांचा पिंड सौंदर्यवादी लेखकाचा असल्यामुळे भाविणीचा प्रश्न ते वेगळयाच रंजनवादी भूमिकेने हाताळतात. भाविणीवर कादंबरी लिहायची.पण मुख्य प्रश्नाला बगल देऊन भाविणीची तरुण सौंदर्यवान कलावंत मुलगी नायिका करून तिच्या माध्यमातून येणारी एक विफल प्रेम कहाणी चित्रित करायची. असेच या कादंबरीचे स्वरूप झाले आहे. केशरही भाविणीची मुलगी म्हणून महेशचे काका व स्वत: महेशाकडून अवेहलना सहन करावी लागते. केशर भाविणीची मुलगी असल्यामुळे ती महेश नावाच्या गायकावर प्रेम करते, त्यांच्यासाठी कुटुंबाचा त्याग करून आजारपणात सेवा करते. त्यांच्या तापट अहंकारी स्वभावाने निर्माण झालेल्या गोष्टी मूकपणे सहन करते. पण तिला प्रेमभंगाचे दु:ख अनुभवावे लागते. आवाज गेल्यानंतर मंगेशीला आल्यावर लक्ष्मीकांत नावाचा एक श्रीमंत विदूर तिला मागणी घालतो. मुलीच्या भवितव्यासाठी चंपा ही मागणी स्वीकारत असली तरी केशर ती नाकारते. डॉ. कैलास या परिचीत विदूराची मागणी मान्य करते. पण कैलास ही तिला बहिण म्हणून सांभाळत असल्यामुळे तिच्या वाटयाला संसार सुख येत नाही. भाविणीचो मुलगी असूनहीती अभोगी राहते. उदात्त काल्पनिक चित्र लेखकाने उभे केले आहे. भाविणीचे दु:ख केशरला अनुभवावे लागत नाही तिच्या दु:खाची जात धार्मिक आणि सामाजिक अंगाने निर्माण होण्यापेक्षा प्रेमभंगातून निर्माण झालेली दिसते. त्यामुळे भाविणीचे दु:ख दाहकतेने उभे करण्यास ही कादंबरी यशस्वी ठरली आहे असे म्हणता येत नाही. सुंदर नायक नायिका

संगीत उदात्त प्रेम , प्रेमभंग, योगायोग आणि दु:खद शेवट यामुळे ही कादंबरी सामाजिक प्रश्नावर लिहिलेली भाविणीचे ओजना साकार करणारी कादंबरी होण्याऐवजी ती रंजनवादी प्रकृतीची कादंबरी ठरते.

सुभाष भेंडे यांनी ख्रिश्चन धर्मातील नन च्या प्रश्नावर जोगीण ही कादंबरी लिहिली आहे. ख्रिश्चन समाज हा महाराष्ट्रात व गोव्यात दीर्घकाळ राहात असला तरी त्या धर्मातील जोगीणीच्या प्रश्नावर लिहिलेली ती मराठीतील पहिलीच कादंबरी आहे. जोगीणीचा प्रश्न धार्मिक आणि सामाजिक अंगाने चित्रीत करण्यात सुभाष भेंडे यांना बरेचसे यश प्राप्त झाले आहे. बर्नाडेट या मुख्य व्यक्तीरेखाच्या माध्यमातून लेखकाने हा प्रश्न चित्रित केला आहे. कॉन्व्हेंटमधील जोगणीची होणारी भावनिक, मानसिक व शारीरिक कुंचबणा दाखविण्यासाठी आवश्यक अशी पार्श्वभूमी लेखकाने पहिल्या भागात लेखकाने विरोधी पध्दतीने उभी केली आहे. त्यामुळे दुसऱ्या भागात येणारे जोगीणीचे चित्र अधिक प्रभावी होते. बर्नी ही गोव्यातील एका ख्रिश्चन कुटुंबातील तरुण मुलगी जीवनावर उत्कट प्रेम करणारी निसर्गात रमणारी, नाताळ आणि वर्षा अखेरच्या पार्टयांत सहभागी होणारी- नृत्य करणारी, टोनीवर प्रेम करणारी अल्लड, रसिक, जीवनासक्त अशा बर्नीचे चित्रण लेखकाने पूर्वार्धात रंगविले आहे. त्यामुळे कादंबरीच्या उत्तरार्धात कॉन्व्हेंटमध्ये ॲगाथा बनल्यानंतर होणारा मनाचा कोंडमारा चित्रित करणे आणि तो उठावदार करणे सोयीचे झाले आहे.

बर्नीने कॉन्व्हेंट व्हॅकेशन स्वीकारल्यानंतर ती ॲगाथा बनते. तीचा मुळ पिंड आणि प्रकृती ही ऐहिक जीवनात रमणारी असल्यामुळे ती कॉन्व्हेंटच्या शिस्त बध्द आणि काटेकोर जीवनात सामाऊ शकत नाही. बायबलचे वाचन, येशूची प्रार्थना, मनाची एकाग्रता काम, क्रोध, माया, मोह,

मोह, मत्सर, या षड्रिपूवर विजय मिळवून विरक्त होण्यासाठी चाललेले तिचे प्रयत्न अयशस्वी ठरतात. एका बाजूने तिला पूर्वआयुष्यातील कौटुंबिक जीवनाचे आकर्षण वाटत राहते, दुस-या बाजूने टोणीवरील प्रेम विसरु शकत नाही. कुटुंबाची झालेली वाताहात तिला पहावत नाही. आणि निसर्गाने दिलेल्या मानवी भावनांचा कोंडमारा होऊ लागतो. वर वर ती प्रार्थना करीत असलो तरी अंतरंगात अतृप्त वासना मय बनून जाते. याच चुकासाठी कनफेशन करते. मदर सुपरियरच्या शिक्षा भोगते. पण अंगी विरक्त जोगीण पण स्वीकारु शकत नाही. तिचा जो भावनिक, मानसिक, शारीरिक कोंडमारा होतो त्याचे चित्रण लेखकाने ताकदीने उभे केले आहे.

जोगीणीचे चित्रण करताना सुभाष भेंडे कॉन्व्हेंटमधील इतर मुलींच्या जीवन कथा आणि व्यथा मुख्य पात्राच्या अनुषंगाने उभ्या करुन हा प्रश्न अधिक दाहकतेने उभा करतात. प्रेमभंग झाल्यानंतर कॉन्व्हेंटमध्ये येणारी फातिमा आपल्या प्रियकराला विसरु शकत नाही व आपल्या भावभावनाही विसरु शकत नाही यातून सुटण्यासाठी आत्महत्येचा मार्ग स्वीकारते. स्वखुशीने आलेली लुईझा, अतृप्त भावनेच्या कोंडमा-याने तिला हिस्टेरिया होतो. मदर सुपरियर या भाजल्या असताना ही जगण्याची जीवनेच्छा मारु शकत नाही. याउलट लुसिओ इझाबेलचा प्रियकर शारीरिक प्रेमाच्या पलीकडे जाऊन क्षय झालेल्या इझाबेलशी विवाह करुन तिला सुखी करण्याचा प्रयत्न करतो. या सर्व घटनामुळे कॉन्व्हेंटमधील निसर्गाच्या विरुध्द जाऊन मुलींना जोगीण बनवण्यासाठी चाललेल्या प्रयत्नातील फोलपणा त्यातील ढोंग, आणि धर्मातील खोट्या रुढी, परंपरा आणि कल्पना यांची यथार्थ कादंबरी रसिकाच्या मनावर बिंबवते. त्यामुळेच या कादंबरीला अभोगीच्या तुलनेत सामाजिक कादंबरी म्हणून अधिक यश प्राप्त होते.

रणजित देसाई यांच्या अभोगी या कादंबरीतील भाविण म्हणून चित्रित झालेल्या केशाऐवेक्षा जोगिणमधील बनीं आणि अँगथा अधिक मानवी वास्तव आणि जीवंत व्यक्तिरेखा वाटते. बनींचे अँगाथा म्हणून जोगीणपण स्वीकारताना येणारे अपयश हे माणूस म्हणून अधिक भावत राहते. व अधिक वास्तव वाटते. म्हणून धार्मिक जीवनातून निर्माण होणारा जोगीणीचा प्रश्न चित्रित करण्यास ही कादंबरी तुलनेने अधिक यशस्वी ठरली आहे. असेच म्हणावे लागेल.

" अभोगी " व जोगीण " या दोन कादंबरीतील संघर्ष वातावरण व भाषाशैलीच्या दृष्टीने तुलना

" अभोगी " व " जोगीण" या कादंब-यातील संघर्षाचा विचार केला तर" अभोगी " ही रंजनवादी कादंबरी आहे. त्यातील संघर्ष हा वरवरचा आहे. तो व्यक्ति आणि व्यक्तिमधील आहे व तो ही प्रेमामुळे गैरसमज होतो. आणि गैरसमज दूर झाले की संघर्ष ही संपतो. असा बेगडी स्वरूपाचा संघर्ष अभोगी या कादंबरीत आला आहे. भाविणीच्या जीवनावर ही कादंबरी प्रकाश टाकत नाही. म्हणून व्यक्तिविरुध्द रुढी परंपरा असा मानसिक संघर्ष चित्रित होत नाही.

सुभाष भेंडे यांच्या जोगीण या कादंबरीतील संघर्ष व सामाजिक धार्मिक पातळीवर असल्यामुळे व्यक्तीविरुध्द धर्म परंपरा व त्यातून निर्माण झालेले दुःख अशा त-हेचं दुःख व संघर्ष जोगीण या कादंबरीत आला आहे.

अभोगी व जोगीण या दोन कादंब-यातील वातावरणाचा तुलनात्मक विचार करता असे दिसून येते की या दोन्ही कादंब-या गोव्याच्या पार्श्वभूमीवर लिहिल्या आहेत. दोन भिन्न धर्मातील देवाला मुली अर्पण करणा-या प्रथेसंबंधी या कादंब-या आहेत. पण दोन भि...

प्रवृत्तीच्या लेखकाने दोन भिन्न धर्मातील भाविण आणि नन या विषयावर कादंबरी लिहिल्यामुळे त्यात फरक जाणवतो रणजित देसाई यांची प्रवृत्ती रंजनवादी असल्यामुळे भाविणीच्या प्रश्नाला आवश्यक अशी धार्मिक पार्श्वभूमी ते चित्रीत करात नाहीत. हिंदू धर्मात आणि विशिषतः गोवा आणि कोकणाच्या परिसरात मंदिराच्या सेवेसाठी आढळणारा भाविणीची परंपरा वंश परंपेरने चालत आली आहे. या धार्मिक रूढी मुळे भाविणीच्या जीवनातील दुःख यातना तिचे धार्मिक हिणत्व अभोगी कादंबरीत चित्रित केलेले आढळत नाहीत किंवा या धार्मिक प्रथेविरूध्द रसिकाच्या मनात जागृती ही कादंबरी घडवत नाही. केवळ रंजनवादी दृष्टीने भविणीचा विषय रणजित देसाईनी आधारासाठी घेतलेला आहे.

सुभाष भेंडे यांनी आपल्या जोगीण या कादंबरीत ख्रिश्चन धर्मातील नन चित्रित केले आहे. ख्रिश्चन धर्मातील जोगीणीच्या प्रथेमागी-मागील धार्मिकता रूढी आणि परंपरा आणि त्यामुळे जोगीण बनणा-या स्त्रीला भोगावे लागणारे दुःख मांडलेले आहे. नवसा, खातर किंवा स्वखुशीने ख्रिश्चन धर्मातील मुली कॉन्व्हेंटचे व्हेकेशन स्वीकारतात कॉन्व्हेंट मधील प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर त्या जोगीण बनतात. जोगीणीची ही परंपरा धार्मिक श्रध्देतून चालू राहते कारण जोगीणीला `ऐहिक जीवनाचा त्याग करून विरक्त पणे समाजाच्या सेवेचे वृत्त स्विकारावे लागते.त्याना कौटुंबिक जीवन जगता येत नाही. सुभाष भेंडे यांनी जोगीणीच्या धार्मिक प्रक्रिये प्रथेमुळे कॉन्व्हेंटमधील मुलींना कसा शारीरिक मानसिक आणि वातनिक कोंडमारा सहन करावा लागतो याचे प्रभावी चित्रण केले आहे ख्रिश्चन समाजातील या प्रथाच्या विरूध्द रसिकांच्या मनात ही कादंबरी घृणा निर्माण करून जागृती करते. सामाजिक अंगाने अभोगी व जोगीण या दोन कादंबरीतील सामाजिक जीवनाच्या चित्रणाची तुलना केली तर असे दिसते की अभोगी या कादंबरीत भाविणीला समाजाकडून मिळणारी हीन वागणूक तिचे समाजातील स्थान तीचा

एक स्वतंत्र व्यक्ती म्हणून तिचा इतर व्यक्तिशी व समाजाशी येणारा संबंध आणि या अंगाने भाविणीचे दु:ख चित्रित झालेले नाही. फुटकळ उल्लेखा पलीकडे कादंबरी आवश्यक असे सामाजिक चित्रण करीत नाही.

'अभोगी' व 'जोगीण' या दोन कादंबरीतील कौटुंबिक चित्रण पाहता असे दिसते की, अभोगी ही कादंबरी रंजनवादी प्रेम कहाणी असल्यामुळे कुटुंबाचे चित्रण ठळक आले नाही. व जे आले ते आठवणीच्या स्वरूपात आले. जोगीण या कादंबरीत बर्नींच्या कुटुंबाचे चित्रण करून कुटुंबातील प्रेम आपआपसातील संबंध यांचे चित्रण आले आहे. बर्नीचे कुटुंबावर खूप प्रेम आहे,व कुटुंबाचेही तिच्यावर खूप प्रेम आहे. या कुटुंब प्रेमातूनच कादंबरी सुरु होते व संपते.

धार्मिक, सामाजिक आणि कौटुंबिक वातावरण निर्माण करण्यामध्ये अभोगी पेक्षा जोगीण ही कादंबरी जास्त उठावदार झाले आहे त्यामुळे जोगीण या कादंबरीची परिणामकारकता वाढली आहे.

" अभोगी"व " जोगीण" या दोन कादंबरीतील भाषाशैली :

अभोगी ही कादंबरी गोव्याच्या पार्श्वभूमीवर लिहिली असली तरी या कादंबरीत गोव्याच्या भाषेचा वापर दिसत नाही. तर ही संपूर्ण कादंबरी प्रमाणभाषेत लिहिली आहे. चित्रपटासाठी पटकथा लिहिली असल्यामुळे या कादंबरीत संवादात्मकता जास्त प्रमाणात जाणवते. कादंबरी थोडया प्रमाणात कलात्मकता जाणवते. कादंबरीची भाषा प्रवाही व गतिमान आहे. जोगीण या कादंबरीत गोव्याच्या पार्श्वभूमीवरील ख्रिश्चन धर्मीयात बोलली जाणा-या इंग्रजी व मराठी संमिश्र भाषेचा वापर भेंडयानी जोगीण या कादंबरीत केला आहे. धार्मिक शब्दाचा व बोलाचाही वापर जोगीण या कादंबरीत केला आहे.

" अभोगी " व जोगीण "या कादंब-याच्या वैशिष्टयांची तुलना

समाजजीवनातील प्रश्न कितीही दाहक असले तरी ते ललित वाङ्‌मयाच्या पातळीवर चित्रित करताना जो लेखक लिहितो. त्याचे व्यक्तिमत्व प्रकृती पिंड, त्यांचा सामाजिक प्रश्नाकडे आणि साहित्यिक कलाकृतीकडे पाहण्याचा दृष्टीकोण त्याची लेखन विषयक भूमिका यावरुन त्या कलाकृतीचे स्वरुप ठरते. प्रस्तुत कादंब-याचे स्वरुप सुध्दा त्या लेखकाच्या प्रकृती धर्मानुसार व सामाजिक प्रश्नाकडे आणि वाङ्‌मयाकडे पाहण्याच्या दृष्टीकोणातून भिन्न ठरल्या आहेत.

"अभोगी" या रणजित देसाई यांच्या कादंबरीचे स्वरुप रंजनवादी कादंबरीचे आहे. तर सुभाष भेंडे यांच्या "जोगीण" या कादंबरीचे स्वरुप तुलनेने अधिक वास्तववादी आणि सामाजिक कादंबरीच्या या दोन कादंब-याच्या स्वरुपवैशिष्ट्यांची तुलना केली, तर स्त्रीयांच्या प्रश्नावर लिहिलेल्या दोन भिन्न प्रवृत्तीच्या कादंबरीवर चांगलाच प्रकाश पडू शकेल.

अभोगी" या कादंबरीचे स्वरुप रंजनवादी झाले आहे. गोव्यातील भाविणीचा विषय कादंबरीसाठी घेण्यापाठीमागे लेखकाची भूमिका सामाजिकतेने प्रश्न हाताळण्याची नाही. भाविण ही मंदिराच्या परिसरातील नृत्यांगणा करणारी सुंदर आणि धनिकांची सेवा करणारी स्त्री म्हणूनच तीचे चित्रण केले आहे. या कादंबरीत चंपा या भाविणीचे जीवन चित्रण करण्याऐवजी लेखक तिच्या तरुण मुलींच्या जीवनाची प्रेमकहाणी रंगवताना दिसते. त्यामुळे या कादंबरीत भाविणीचा प्रश्न केवळ आधारासाठी घेतलेला दिसतो. भाविणीला भोगावे लागणारे दुःख तिचे दाहक वास्तव लेखक चित्रित करीत नाही.

"जोगीण" ही सुभाष भेंडे यांची कादंबरी ख्रिश्चन धर्मांच्या नन्सच्या जीवनावर आधारित आहे. ही कादंबरी सामाजिक व वास्तववादी भूमिकेतून नन्सचे जीवन कलात्मक पातळीवर रेखाटते. या कादंबरीचे स्वरूप प्रामुख्याने सामाजिक कादंबरीचे आहे. ख्रिश्चन धर्मातील जोगीणीचा प्रश्न बर्नी या मुख्य व्यक्तिरेखेच्या अनुषंगाने चित्रित केला आहे. कॉन्व्हेंटमधील धार्मिक परंपरा आणि प्रथामुळे नन्सच्या होणाऱ्या शारीरिक आणि भावनिक कोंडमाऱ्याचे प्रत्ययकारी चित्रण सुभाष भेंडे यांनी केले आहे. त्यामुळे ही कादंबरी जोगीणींच्या प्रश्नावर प्रकाश टाकते. रसिकाना अस्वस्थ बनून जोगीणींच्या परंपरेविरूद्ध त्यांची मनोभूमिका तयार करते. त्यामुळे या कादंबरीला सामाजिक आशयाच्या दृष्टीने वैशिष्टयपूर्णता लाभली आहे.

प्रस्तुत कादंबऱ्याची वैशिष्टये पाहत असताना लक्षात येते की "जोगीण" ही कादंबरी समाज वास्तवाभिमुख आहे. त्यामानाने अभोगी ही कादंबरी रंजनवादी आहे या दोन्ही कादंबऱ्याच्या भिन्न प्रवृत्तीमुळे जोगीण ही कादंबरी अभोगी पेक्षा वैशिष्टयपूर्ण ठरली आहे.

प्रस्तुत कादंबऱ्यात एकच विषय मांडला असला तरी मुळातच सुभाष भेंडे यांची लेखन प्रवृत्ती वास्तववादी असल्याने अभोगी च्या संदर्भात जोगीण ही कादंबरी अधिक महत्वाची ठरली आहे.

प्रस्तुत प्रकरणात अभोगी व जोगीण या कादंबऱ्याची तुलना केली ही तुलना करीत असताना अभोगी पेक्षा जोगीणचे वेगळेपण कसे आहे हे तपासून पाहिले आहे. पुढील प्रकरणात आतापर्यंत पाहिलेल्या अभ्यासाचे निष्कर्ष मांडावयाचे आहेत.

संदर्भ-टीपा


| | |
|---|---|
| १. भेंडे, सुभाष | " जोगीण" मॅजेस्टिक प्रकाशन मुंबई, दुसरी आवृत्ती पृ. क्र. ५०. |
| २. देसाई, रणजित | " अभोगी " महेता पब्लिशिंग हाऊस, कोल्हापूर द्. आवृत्ती पृ. क्र. १२६. |
| ३. तत्रैव | पृ. क्र. १२६ |